# मद्यावरील 'व्हॅट'वाढीने नुकसानीची भीती

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

मुंबईसह राज्यातील मद्यप्रेमींना नोव्हेंबरपासून बार, हॉटेलमध्ये मद्याचा आनंद घेताना अतिरिक्त पाच टक्के व्हॅटचा भार सहन करावा लागणार आहे. राज्य सरकारने रेस्तरांमधील अल्कोहोल सेवनावर व्हॅटवाढीचा निर्णय घेतला आहे. सध्या पाच टक्के इतका असलेला व्हॅट आता १० टक्क्यांवर जाणार असल्याने हॉटेल व्यावसायिकांमध्ये नाराजी आहे. ही वाढ ग्राहकांप्रमाणेच संपूर्ण हॉटेल व्यवसायावर विपरित परिणाम करणार असल्याची भीती व्यक्त केली आहे. त्यामुळे राज्य सरकारने हा निर्णय मागे घेण्याची मागणी असोसिएशन ऑफ हॉटेल अँड रेस्टॉरंट ओनर्स (आहार) संघटनेने केली आहे.

राज्य सरकारने हॉटेलमध्ये मद्यावरील प्रस्तावित व्हॅटवाढीचा निर्णय उद्योग व्यवसायांना नुकसानदायक ठरणार असल्याकडे संघटना आणि हॉटेल व्यावसायिकांनी लक्ष वेधले आहे. करवाढीचा निर्णय घेताना संबंधित घटकांशी सल्लामसलत केली नसल्याचा मुद्दाही उपस्थित केला आहे. राज्यातील १८ हजार बारमध्ये राज्यात वार्षिक विक्री होणाऱ्या ३३ कोटी लीटर बिअरपैकी ५० टक्के आणि इंडियन मेड फॉरेन लिकरच्या (आयएमएफएल) वार्षिक २८ कोटी लीटरपैकी सुमारे ३० टक्के म्हणजे ८.५ कोटी लीटर इतकी विक्री होते. त्यातून राज्यास मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होतो. त्यातच, राज्य उत्पादन शुल्क विभागाने बीअर शॉप लायसन्स लागू केल्याने बार, हॉटेलांवर परिणाम होणार असल्याचे बोलले जात आहे. याठिकाणी एमआरपी किंमतीप्रमाणेच मद्यपानास परवानगी असल्याने हॉटेलांना व्यवसायात बरेच नुकसान सहन करावे लागेल, अशीही भीती व्यक्त केली आहे. या सर्व मुद्यासंदर्भात आहार संघटनेचे शिष्टमंडळ लवकरच राज्य उत्पादन शुल्कमंत्री, वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन देणार असल्याचे 'आहार'चे अध्यक्ष सुकेश शेट्टी यांनी सांगितले.

हॉटेल व्यवसायास इतर घटकांची स्पर्धा असतानाच त्यात अतिरिक्त पाच टक्के व्हॅटने ग्राहक अन्य पर्याय स्वीकारतील. याचा परिणाम केवळ हॉटेल, बार यांच्यावर होणार नसून एकूणच महसुलावर होईल. महसूल कमी झाल्यास कर मिळण्याचे प्रमाणही घटत जाईल, याकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

## 'आहार'चा पाच टक्के वाढीव कराला विरोध




"देशाच्या अर्थव्यवस्थेत पर्यटन क्षेत्राचे योगदान जीडीपीच्या सुमारे नऊ टक्के आहे. १२ टक्क्यांहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. पर्यटन क्षेत्रात मद्याला महत्त्व आहे. गोवा, हरयाणा आणि चंडीगडसह अनेक राज्यांनी ही वस्तुस्थिती ओळखून विक्री वाढवण्यासाठी आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी त्यावरील शुल्क कमी केले आहे. आपल्या राज्यात याविरुद्ध स्थिती आहे व त्यामुळे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पर्यटनावर विपरित परिणाम होईल.

– प्रदीप शेट्टी, अध्यक्ष, हॉटेल व रेस्तरां असोसिएशन (पश्चिम भारत)